# ऑन लाईन परीक्षे संबंधित प्रश्न व त्यांची उत्तरे ( विद्यार्थ्यांसाठी)

| प्रश्न क्रमांक | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|
| १ | मला ऑनलाईन परीक्षा देण्यासाठीचे संकेतस्थळ एस एम एस द्वारे अथवा ई मेल द्वारे मिळाले नाही | कृपया तुम्ही वापरत असलेला मोबाइल नंबर हा विद्यापीठाशी संलग्नीत (रजिस्टर) केला आहे का याची खात्री करा आणि आमच्या तक्रार निवारण केंद्राच्या नंबर वरती कॉल करून संकेतस्थळाची माहिती मिळवू शकता. (https://su-exam.eduapp.co.in/ ) |
| २ | ऑनलाईन परीक्षा देण्यासाठीचे संकेतस्थळ (लिंक) सुरु होत नाही | कृपया आपली इंटरनेट सेवा सुरु असल्याची खात्री करा. |
| ३ | ऑनलाईन परीक्षेसाठी मोबाइल प्ले स्टोअर मध्ये ऍप आहे का | नाही |
| ४ | मी सराव परीक्षा दिली नाही त्यामुळे मला परीक्षा कशी द्यावी हे कसे समजणार | कृपया विद्यापीठाच्या संकेत स्थळावर अपलोड केलेला परीक्षा संदर्भातील विडिओ पाहावा. |
| ५ | हेल्पलाइन नंबर शी संपर्क होत नाही | कृपया दुसऱ्या हेल्पलाइन नंबर शी संपर्क करण्याचा प्रयत्न करा. |
| ६ | मला ऑनलाईन परीक्षा देण्यासाठीचे युजर आय डी आणि पासवर्ड मिळाला नाही | कृपया आमच्या तक्रार निवारण केंद्राच्या नंबर वरती कॉल करून तुमचा युजर आय डी आणि पासवर्ड मिळवू शकता |
| ७ | मी उत्तरासाठीचे पर्याय पाहू शकत नाही. | आपली इंटरनेट सेवा सुरु असल्याची खात्री करा. जर ती सुरु नसल्यास इंटरनेट सेवा चालू करून संकेतस्थळ बंद करून परत एकदा लॉग इन करू शकता |
| ८ | उचित पर्याय निवडण्यासाठी सबमिट बटण दाबले जात नाही त्यामुळे माझे उत्तर सबमिट झाले कि नाही हे कळत नाही | कृपया घाबरून न जाता संकेतस्थळ बंद करून परत एकदा लॉग इन करू शकता आणि तुमचें उत्तर हे स्वयंचलित तंत्राद्वारे संग्रहीत होतील |
| ९ | ऑनलाईन परीक्षा देण्यासाठीचे संकेतस्थळ वारंवार बंद होत आहे | कृपया काळजी करू नका. संकेतस्थळ बंद करून परत एकदा लॉग इन करू शकता |
| १० | परीक्षा वेळापत्रक नुसार पेपर वेगळा मिळाला आहे. | कृपया काळजी करू नका,(एकाधिक विद्यार्थ्यांकडून पुष्टी मिळाल्यानंतर) परीक्षा थांबविण्यास सांगा, आम्ही तुमची परीक्षा पुन्हा चालू करीत आहोत. |

| | | |
|---|---|---|
| ११ | माझी इंटरनेट प्रणाली बंद झाल्यामुळे परीक्षा मध्येच बंद झाली | कृपया काळजी करू नका संकेतस्थळ पुन्हा चालू करून परत एकदा लॉग इन करा आणि उर्वरित वेळेत राहिलेल्या प्रश्नांची उत्तरे द्या. |
| १२ | माझी सिस्टिम( अँड्रॉईड फोन / लॅपटॉप / डेस्कटॉप हे हँग झाले आहे | कृपया आपली सिस्टिम( अँड्रॉईड फोन / लॅपटॉप / डेस्कटॉप ) बंद करून पुन्हा सुरु करावे आणि परत लॉग इन करून परीक्षा द्यावी. |
| १३ | ज्या फोन वरून सराव परीक्षा दिली होती तो फोन बंद आहे | सदरची परीक्षा हि इंटरनेट ब्राउझर वरून देत असल्याने कोणत्याही सिस्टिम( अँड्रॉईड फोन / लॅपटॉप / डेस्कटॉप) चा वापर करून करून परीक्षा द्यावी. |